**ठळक बातम्या**

- राज्यात जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरू, सुरवातीच्या कलानुसार भाजपा आणि महायुतीतले पक्ष आघाडीवर

- लोकसभेत सभापतींविरोधात अविश्वासाचा ठराव मांडण्याचा विरोधकांचा निर्णय

- परीक्षा पे चर्चा च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात प्रधानमंत्र्यांचा देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतून मुंबईचा संघ बाद

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या मतमोजणीला सकाळी दहा वाजता सुरुवात झाली. सुरवातीच्या कलानुसार भाजपा आणि महायुतीतले घटक पक्ष आघाडीवर आहेत.

आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार **सातारा** जिल्हा परिषदेत भाजपाने १३, शिवसेनेने ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने १२ जागा जिंकल्या आहेत. **सोलापूर**मधे भाजपा ८, शिवसेना एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस एका जागेवर विजयी झाली आहे. **लातूर**मधे काँग्रेस १९, भाजपा १८, राष्ट्रवादी काँग्रेस १० तसंच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला प्रत्येकी एका जागेवर यश मिळालं आहे. रेणापूर तालुक्यात पानगावमध्ये मनसेचे सुनील नागरगोजे विजयी झाले. याठिकाणी पंचायत समितीच्या गणातूनही मनसेचे उमेदवार विजयी झाले आहेत. **धाराशिव**मधे भाजपाने आणि शिवसेनेने दहा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागा जिंकल्या आहेत. **सिंधुदुर्ग**मधे भाजपा २०, शिवसेना ८ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २ जागांवर

विजयी झाला आहे. **कोल्हापूर**मधे महायुतीने ३४ जागा जिंकल्या आहेत. यात भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रत्येकी दहा जागांवर विजयी झाला असून जनसुराज्य पक्षाने चार जागा जिंकल्या आहेत. महाविकास आघाडीने आतापर्यंत १५ जागा जिंकल्या आहेत. यात काँग्रेसच्या १३ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दोन जागांचा समावेश आहे. **पुणे** जिल्हा परिषदेत भाजपने १६, शिवसेनेने ४, राष्ट्रवादी काँग्रेसने २४ जागा जिंकल्या आहेत. **छत्रपती संभाजीनगर**मधे भाजपा आणि शिवसेना प्रत्येकी १५ जागांवर विजयी झाले आहेत. तसंच **परभणी**मधे आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार भाजपा ३, शिवसेना २, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ४, राष्ट्रवादी काँग्रेस ३ जागांवर विजयी झाले आहेत.

**रायगड**मधे भाजपा ६, शिवसेना ८, राष्ट्रवादी काँग्रेस ४, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष दोन जागांवर विजयी झाला आहे. रायगड जिल्हा परिषदेत मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले बिरवाडी गटातून विजयी झाले असून आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी थळ गटातून विजयी झाल्या आहेत. पण मोठे वेणगाव गणातून आमदार महेंद्र थोरवे यांच्या स्नुषा पराभूत झाल्या आहेत.

**रत्नागिरी**त अनेक ठिकाणी शिवसेनेचे उमेदवार आघाडीवर असून काही ठिकाणी अटीतटीच्या लढती सुरू आहेत.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांसाठी ७ फेब्रुवारीला मतदान झालं. जिल्हा परिषदेच्या २ हजार ६२४ आणि पंचायत समितीच्या ४ हजार ८१४ उमेदवारांचं भवितव्य आजच्या निकालातून ठरणार आहे.

या निवडणुकीत एकूण सरासरी ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के मतदान झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

<><><><><>

पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या मंजुषा नागपुरे, तर उप महापौरपदी आरपीआयचे परशुराम वाडेकर हे बिनविरोध निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीतल सावंत आणि काँग्रेसच्या अश्विनी लांडगे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे ही निवड बिनविरोध झाली.

लातूर महानगरपालिकेच्या महापौरपदी जयश्री सोनकांबळे आणि उप महापौरपदी स्नेहल उटगे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

आज या निवडींची औपचारिक घोषणा झाली.

<><><><><>

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू न दिल्याबद्दल लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्यासाठी विरोधकांनी ठराव मांडण्याचा निर्णय घेतला आहे. संविधानाच्या कलम ९४ क अन्वये हा ठराव मांडण्यात येणार आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दालनात आज झालेल्या विरोधी पक्ष सदस्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला द्रमुक, सपा, राजद, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, तृणमूल काँग्रेस या पक्षांसह इतर विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. आभार प्रस्तावावर विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात बोलू न देणं, भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यावर कारवाई न करणं आणि काँग्रेसच्या महिला खासदारांवर निराधार आरोप केल्याबद्दल बिर्ला यांच्या विरोधात हा ठराव मांडण्यात येईल.

दरम्यान लोकसभेत सभापती सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली असून त्यांनी महिला खासदारांचा स्वाभिमान दुखावला असल्याचा आरोप काँग्रेसच्या महिला

खासदारांनी केला आहे. याबद्दल  निषेध करणारं एक पत्र या खासदारांनी सभापती ओम बिरला यांना दिलं.

<><><><>

लोकसभेतल्या गदारोळाला काँग्रेस जबबाबदार असल्याचा आरोप कंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केला आहे. संसद भवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. ते म्हणाले की, कांग्रेस खासदारांच्या बेशिस्त वर्तनामुळे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरची चर्चाही सभागृहात पूर्ण होऊ शकली नाही. अर्थसंकल्पावरच्या चर्चेत सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली नाही, आणि आवाजी मतदानाने अर्थसंकल्प मंजूर करावा लागला तर त्याला काँग्रेस जबाबदार असेल आणि त्याने त्यांचंही नुकसानच होईल, असं रिजिजू म्हणाले.

<><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातल्या आजच्या नवव्या दिवशी लोकसभेचं कामकाज गदारोळामुळे आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे.  काँग्रेसचे पी चिदंबरम यांनी चर्चेला प्रारंभ केला.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी ‘परीक्षा पे चर्चा’२०२६ च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ येत असल्यानं, परीक्षेचा ताण, परीक्षेची तयारी, वेळ व्यवस्थापन तसंच विद्यार्थ्यांनी या परीक्षांना आत्मविश्वासानं कसं सामोरं जावं यावर या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली.  ‘परीक्षा पे चर्चा’ हा कार्यक्रम यावर्षी देवमोगरा, कोईम्बतूर, राजपूर, गुवाहाटी आणि दिल्लीचा ७, लोककल्याण मार्ग या ठिकाणी झाला. साडे चार कोटी  विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी मायगव्हच्या माध्यमातून नोंदणी केली होती, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली आहे.

**<><><><>**

अजूनही नक्षल चळवळीत राहिलेल्या नक्षलवाद्यांनी शस्त्र टाकून शरण यावं आणि मुख्य प्रवाहात सहभागी व्हावं असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. त्यांचं पूर्ण सन्मानानं पुनर्वसन होईल, याची खात्री सरकार देईल, असंही ते म्हणाले. छत्तीसगडमधल्या जगदालपूरमध्ये बस्तर पंडूम महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

**<><><><>**

प्रधानमंत्री आवास योजनेअतंर्गत लाभार्थ्यांना ९० लाखांहून अधिक घरांचं वाटप करण्यात आल्याची माहिती केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. ही योजना २०१५मध्ये सुरू करण्यात आली होती आणि देशभरात आतापर्यंत एकूण १ कोटी १२ लाख घरांना मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती लाल यांनी आपल्या उत्तरात दिली.

**<><><><>**

मुंबई मेट्रोच्या २ ब मार्गिकेवरच्या पाचही स्थानकांना इंडियन ग्रीन बिल्डिंग काउन्सिलकडून पर्यावरणपूरक संकल्पना आणि नाविन्यपूर्ण बांधकामासाठी सर्वोच्च दर्जा देण्यात आला आहे. देशभक्त एन. जी. आचार्य उद्यान – डायमंड गार्डन मेट्रो स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मेट्रो स्थानक, बीएसएनएल मेट्रो स्थानक, मानखुर्द मेट्रो स्थानक आणि महाराष्ट्र नगर मंडळे मेट्रो स्थानक या स्थानकांना प्लॅटिनम रेटींग मिळालं आहे.

**<><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतून मुंबईचा संघ बाहेर पडला आहे. उपांत्य पूर्व फेरीत कर्नाटकनं मुंबईला ४ गडी राखून पराभूत केलं. मुंबईतल्या शरद पवार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून मुंबईनं

फलंदाजीचा निर्णय घेतला. मुंबईनं पहिल्या डावात ११० तर दुसऱ्या डावात ३७७ धावा केल्या. कर्नाटकनं पहिल्या डावात १७३ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात ६ गडी गमावून ३२५ धावांचं लक्ष्य गाठलं. के एल राहुलच्या १३० आणि रविचंद्रन स्मरणच्या नाबाद ८३ धावांनी कर्नाटकचा डाव सावरला.

या विजयामुळं कर्नाटक उपांत्य फेरीत पोहोचला आहे. जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडच्या संघानंही उपांत्य फेरीत स्थान मिळवलं आहे. आंध्र प्रदेश आणि बांग्लादेश यांच्यात उपांत्य पूर्व फेरीतला सामना सुरू असून त्यातला विजेता उपांत्य फेरीत पोहोचेल.

**//<><><><><>//**